# आधारशीला

सौ. शोभा सतीश राऊत

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B 287

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**आधारशीला : सौ. शोभा सतीश राऊत**

© **सौ. शोभा सतीश राऊत**

'शब्दांगण', प्लॉट नं. १७,
जरगनगर, कोल्हापूर.
फोन : (०२३१) २६३७७७८, मो. ९९२३८९७८९८

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
पहिली आवृत्ती- १९८८, दुसरी आवृत्ती- २०००, तिसरी आवृत्ती- २००९,
चौथी आवृत्ती- २९ ऑगस्ट, २०१३ (चित्रपट- आभाळाची सावली)

**किंमत**
₹ १४०/-

---

(या कादंबरीतील सर्व पात्रे व प्रसंग काल्पनिक आहेत. वास्तवाशी मेळ जमल्यास तो केवळ योगायोग समजावा.)

# आधारशीला

शब्दांवर ज्यांचे प्रभुत्व आहे.
माणसांचा प्रचंड संग्रह ज्यांच्या गाठीशी आहे, असे
ज्येष्ठ व श्रेष्ठ कवीमित्र,
श्री. अशोक भोईटे व सौ. आशा अ. भोईटे
या स्नेही उभयतांना सस्नेह भेट...

# १

''आई गं!''

नीता ती बातमी वाचून अक्षरश: हवालदिल झाली. दु:ख वेगाने तिच्या तोंडून 'आई गंऽऽ' ''एवढाच शब्द बाहेर पडला. आणि मग ती ढसाढसा रडू लागली. काय करावे तिला काही सुचेना. नीता कितीतरी वेळ रडत होती. यावेळी घरात कोणीच नव्हते म्हणून तिला बरं वाटलं.

आता या पुढे काय करायचं आपण? कुठं जायचं? कोणाचा आधार घ्यायचा? कितीतरी अनुत्तरित प्रश्न तिच्यापुढे उभे होते. मार्ग काहीच दिसत नव्हता. यापुढे ऑफिसमध्ये जायचे नाही हा निर्णय त्या विफल अवस्थेत तिने घेऊन टाकला. पण पुढे काय? हा प्रश्न तिला भेडसावत होता.

असं कसं झालं? का झालं? आपण तर किती स्वप्न पाहिली होती. ती अशी अचानक चक्काचूर कशी झाली? ती स्वप्न पाहण्यात आपली चूक झाली का? कदाचित तसेच असेल. म्हणून तर देवाने आपल्याला ही शिक्षा दिली – पण ही शिक्षा मला द्यायची होती. ती त्यांना मिळाली? हो आणि त्यांना एकट्यांनाही नाही. ही शिक्षा तर आपल्याला, आपल्या येणाऱ्या बाळाला– त्याचा काय दोष होता? पण नाही आता ही सजा त्यालाही भोगावी लागणार आहे.

नीता किती तरी वेळ रडत होती भकासपणे! घरात कोणी नव्हतं हेही एक फायद्याचं होतं म्हणून तरी तिला असं मोकळेपणाने रडता आलं. नाहीतर डोळ्यात

पाणी आणणंही शक्य नव्हतं. आता यापुढे काय? घरात तर कोणालाच कसलीही शंका नाही.आई-बाबांना समजले तर? हो आणि ह्या गोष्टी लपवणार तरी किती दिवस? थोड्या दिवसांनी सर्वांना हे कळणार आणि मण आपण सगळ्यांच्या दृष्टीने कुलटा ठरणार, पापिणी ठरणार. हो आणि कोणी तसं म्हटलं तरी त्यात त्यांचं तरी काय चुकणार? काय करायचं तरी कायं? आपली आई आपल्याला नोकरीही सोडू देणार नाही. तिचा तर फक्त घरात आणणाऱ्या पैशाशीच संबंध आहे. बोलून-चालून सावत्र आई ती. लहानपणापासूनच किती त्रास दिला आहे. अजूनही तो चालू आहे. कधी तिला वाटत नसेल, ही पोर-हिलाही प्रेमाच्या-मायेच्या शब्दांची गरज आहे? पण नाही-तिच्या तोंडून प्रेमाचा एकादा शब्दही येणार नाही-आणि आपली धाकटी बहीण-अर्थात सावत्रच; रूपाली-रूपा. ती-ती तर आपल्याला जगणंही मुश्कील करेल. आताच काही तरी निर्णय घ्यायला पाहिजे आपल्याला. नीता विचार करीत होती. तिच्या समोरचे मार्ग बंद झाले होते. कुठलीतरी आडवाटच आता तिला शोधावी लागणार होती. पण त्याही परिस्थितीत तिने निर्णय घेतला. पोटातल्या बाळाला जन्म द्यायचा. प्रयत्न तरी करायचाच करायचा, हां, जेव्हा आपले प्रयत्न विफल होतील-आणि तेव्हा-आपण आपल्या सोबतच त्यालाही घेऊन-पुढच्या कल्पनेने तिचं अंग शहारलं.

घरात कोणाला कसली कल्पना नाही-अजून दोन महिने आपण घरात राहू शकू कोणाला संशय येणार नाही-पण त्यानंतर-हे घर सोडायला पाहिजे-पण आई विचारेल कामाला का नाही गेलीस तर-तर काय उत्तर द्यायचं? काही तरी सांगायला पाहिजे, पटेल असं.

''नीता,घरात कशी तू?कामाला नाही गेलीस?''

''सध्या आम्हाला सुट्टी आहे.''

कसली?''

''आमचं ऑफिस दुसरीकडं हलवणार आहेत. नवीन बिल्डिंगमध्ये गेल्याशिवाय काही काम होणार नाही. म्हणून आम्हाला सगळयांना सुट्टी दिली आहे सरांनी.''

''किती दिवस?''

''कदाचित महिना लागेल-''

''आणि पगाराचं काय? की त्यालाही सुट्टी?''

''छे! छे! पगार मिळणार-हं, नाही तर आम्ही कशाला सुट्टी घेतली असती?''

''मग ठीक आहे. आता तू घरात आहेस तेव्हा घरातलं सगळं काम तू करायचं, मी आणि रूपा कशाला हात लावणार नाही.''

''बरं-'' नीताने कशीतरी वेळ मारून नेली. बर झालं आपली आई अडाणी आहे. नाहीतरी थाप पचली नसती. हा-पण नंतर तिला पगार म्हणून कुठले पैसे आणून द्यायचे? नीता,आपलं दु:खी मन संभाळून घरातलं काम संभाळत होती. पंधरा दिवसांनी तिची मैत्रीण सुरेखा तिला भेटायला आली.

''नीता, तुझी तब्येत ठीक आहे ना? ऑफिसमध्ये आली नाहीस? झालं ते फार वाईट झालं गं. ऑफिसमध्येही सगळे दु:खी आहेत. आजच ऑफिस सुरू झालं. सुट्टी होती. नेहमीसारखं वातावरण नाही बघ. सगळ कसं चिडीचूप- त्यात तूही नाहीस. माझं मन तर कामात लागेना. सरळ उठले आणि आले इथं-''

नीताला रडू आवरत नव्हते. ती रडत होती आणि सुरेखा तिची समजूत घालत होती. पण-सुरेखालाही माहिती होते,आपल्या शब्दांनी तिचं दु:ख हलकं होणार नाही. तिची जखम खोल आहे. शब्दांच्या फुंकरीचा तेथे उपयोग नाही. ती तरी दुसरं काय करणार होती? शब्दांनी सांत्वना देण्यापलीकडं,थोड्यावेळाने नीता शांत झाली.

''सुरेखा, तुला माहीत नाही. आमच्या दोघांशिवाय कोणालाही माहीत नाही. पण-कसं सांगू तुला? अगं, मी- मी आई होणार आहे- आणि-'' पुढचं तिला बोलता येईना-पुन्हा ती रडू लागली. सुरेखालाही धक्का बसला होता. अस काही घडेल यावर तिचा विश्वास बसत नव्हता. पण स्वत: नीता हे सांगते आहे म्हणजे-सुरेखाही गंभीर झाली. नीताच खरं दु:ख आता तिला समजलं-नीताने आपला निर्धार तिला सांगितला, आणि सुरेखा जास्तच गंभीर झाली. तिला माहिती होतं-नीताने घेतलेला निर्णय धाडसाचा आहे. पण-तो तिला पार पाडणं अतिशय कठीण आहे.आपण तिची मैत्रीण आहोत पण-आपण तरी तिला काय मदत करणार, काही नाही! फक्त सहानुभूती दाखवू शकतो. थोडा वेळ बसून सुरेखा निघून गेली. नीता अजूनही रडत होती.

✦✦✦

# २

नीत चालत होती. हातात एक पिशवी आणि त्यामध्ये तिच्या दोन साड्या. एक पर्स. थोडीशी चिल्लर बस्स! एवढ्या भांडवलावर तिने घर सोडलं होतं. आता यापुढे तिला घरात राहाणं शक्य नव्हतं. कुठे जायचं हा विचार ती अनेक दिवस-अनेक रात्री करत होती. शेवटी घराबाहेर पडणं याशिवाय मार्ग नव्हता. मनाशी काही  विचार करून ती चालत होती. या दीड महिन्यात ती मनाने आणि शरीराने पार थकली होती. त्याचमुळे असेल ती फार दमली होती. तिला चालवत नव्हतं. धाप लागत होती. तिने चालण्याचा वेग कमी केला. खूप कमी आणि ती हळूहळू चालू लागली. घाम पुसत. थोड्यावेळाने तिला थोडं बरं वाटल, तिच लक्ष गेलं.समोर एक भलामोठा बंगला होता. 'आसरा' तिचे  पाय थबकले. पाच दहा मिनिटं ती तेथेच उभी राहिली आणि मग बंगल्याच्या दिशेने चालू लागली, बाहेर उभ्या असलेल्या गुरख्याने तिला विचारले,

''क्या काम है? किसी को मिलना है?''

''बाईसाहेबांना''

''काम क्या है?''

''खाजगी आहे. पर्सनल''

''ठीक है! जा सकती हो''